२५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणूका सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण सुधारीत आदेश, २०२२

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०४/का-७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- ०९/०५/२०२२

## आ दे श

**ज्याअर्थी**, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार:-

i) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पुर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत.

ii) जिल्हा परिषदा व पंचायत समितींच्या निवडणुका मुक्त, न्याय्य व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

iii) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची मुदत संपण्यापूर्वी तेथे सार्वत्रिक निवडणूक घेणे बंधनकारक आहे.

**आणि ज्याअर्थी,** जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसंदर्भातील विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी विचारात घेता, प्रभाग रचनेची सुरुवात सर्व साधारणपणे मुदत संपण्याच्यासुमारे सहा महिने अगोदर करावी लागते.

**आणि ज्याअर्थी,** शासनाने दरम्यानच्या कालावधीत खालील अध्यादेश/ विधेयक निर्गमित केले आहेत:-

i. "महाराष्ट्र अध्यादेश क्र.३, २०२१" दिनांक २३ सप्टेंबर, २०२१:- याअन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या मध्ये नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील, मात्र एकूण आरक्षण जिल्हा परिषद / पंचायत समित्यांतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, अशा आशयाची तरतूद केली.

   मात्र सदर सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र. ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ मधील दि.१५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पुर्ण करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करुन त्यानुसार तरतूद करत नाही, तोपर्यंत आगामी सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घ्यावा लागतील.

ii. **सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१८** :- या अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९(१)(अ) मध्ये जिल्हा परिषदेतील निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या ५०-७५ ऐवजी ५५-८५ अशी सुधारित केली आहे.

iii. **महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ६३, दि.२१ फेब्रुवारी,२०२२ ची अधिसूचना**- या अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम,१९६२ च्या नियम २-अ मध्ये जिल्हयातील मतदार विभागातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाच्या

परिषद सदस्यांची संख्या ७५ पेक्षा अधिक व ५० पेक्षा कमी ऐवजी ८५ पेक्षा अधिक व ५५ पेक्षा कमी असणार नाही अशी सुधारणा केली आहे. तसेच प्रत्येक जिल्हयातील मतदार विभागातून प्रत्यक्ष निवडून द्यावयाचा परिषद सदस्यांची संख्या निश्चित करण्याकरिता विहित सूत्र $\frac{(\text{क्ष}-\text{य})}{\text{२५}}$ ऐवजी $\frac{(\text{क्ष}-\text{य})}{\text{३०}}$ अशी सुधारणा केली आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र अध्यादेश क्र.३, २०२१” दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ८४१/२०२१ (श्री. विकास गवळी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मधील दि. ०४/०३/२०२१ तसेच सदर याचिकेशी संलग्न पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ (श्री. राहुल वाघ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ (श्री. विकास गवळी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मधील दि.१५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करुन त्यानुसार तरतूद करत नाही, तोपर्यंत आगामी निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घ्यावा लागतील.

**आणि ज्याअर्थी,** मा. सर्वोच्च न्यायालयामधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ यामध्ये दि.१९/०१/२०२२ रोजी झालेल्या आदेशानुसार राज्याने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाबाबत असलेली आकडेवारी संबंधित मागासवर्ग आयोगास द्यावी. मागासवर्ग आयोगाने सदर आकडेवारी तपासून त्यानुसार योग्य ती शिफारशी राज्यास तसेच राज्य निवडणूक आयोगास कराव्यात असे मा. न्यायालयाने आदेशित केले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.१४१/२०२२ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०३/०३/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मागासवर्ग आयोगाने सादर केलेला अहवाल फेटाळला असून पुढील निर्देश मिळेपर्यंत, जेथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक होणार आहेत तेथे दि.१५/१२/२०२१ व दि.१९/०१/२०२२

रोजीच्या निर्देशाचे राज्य निवडणूक आयोग पालन करेल आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची वैधानिक मुदत संपण्यापूर्वी त्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यास विलंब होणार नाही याची खात्री करेल, असे मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगास निर्देश दिले आहे.

**आणि ज्याअर्थी**, आयोगाचे दि.१८/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहे मार्च, २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तत्कालीन अधिनियमात असलेल्या तरतुदीनुसार प्रभाग रचनेचा कच्चा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. तथापि, राज्य शासनाने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१८/२०२२ दि.३१/१/२०२२ अन्वये जिल्हा परिषद सदस्य संख्येत वाढ केल्याबाबत सुधारणा केली. सदर सुधारणा अधिनियमान्वये सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना सुधारीत सदस्य संख्येनुसार प्रभाग रचनेचा कच्चा आराखडा पुन्हा तयार करण्याचे दि.२/०२/२०२२ रोजी निर्देश देण्यात आले व त्याअनुषंगाने आयोगाचे दि.०४/०२/२०२२ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार दि.१५/०२/२०२२ पर्यंत सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रभाग रचनेचे कच्चे आराखडे प्राप्त झाले व सदर प्राप्त कच्च्या आराखडयाची आयोगाच्या स्तरावर तपासणी करण्याचे काम सुरु करण्यात आले होते.

**आणि ज्याअर्थी**, राज्य शासनाने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, दि.११/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९ (१)(अ), कलम १२(१) व कलम ५८(१)(अ) मध्ये राज्य शासनाने जिल्हा परिषद सदस्य निश्चित करुन निवडणूक विभाग व निर्वाचक गणाची विभागणी राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने प्रसिध्द करण्याबाबत तरतूद करण्यात आली. तथापि सदर सुधारणा अधिनियमास मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्याअनुषंगाने दाखल रिट याचिका ह्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ शी सलग्न करण्यात आल्या असून त्यांची दि.०४/०५/२०२२ रोजी एकत्रित सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात

आल्यानंतर स्थगित केलेल्या टप्प्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही पुढे सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम ९(१) व महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेण्याबाबत) नियम,१९६२ नियम २(अ) मधील सुधारणा व न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकाकरिता प्रभाग रचना व आरक्षणाबाबत सुधारीत आदेश देणे आवश्यक असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

**त्याअर्थी**, मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ९-अ (४) नुसार मिळालेल्या प्राप्त अधिकारांचा वापर करून २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणेबाबतचे यापुर्वीचे दि.०४/१०/२०११ व दि. १२/०३/२०२० चे आदेश अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देत आहे:-

१. संक्षिप्त नाव:

या आदेशाला **“जिल्हा परिषदा व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२२”** असे संबोधिले जाईल.

२. अधिकार प्रदान:

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१२/का.०७, दि. २९/०९/२०११ अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चित करून ते चक्रानुक्रमे फिरवणे, या बाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना व प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे, प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन प्रभाग रचना अंतिम करणे याबाबतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना यापूर्वीच प्रदान केले आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावरील लोकशाही मजबूत करण्यात जिल्हा

परिषदा व पंचायत समित्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे; त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

३. <u>विहित मुदतीत निवडणूक घेणे:</u>

भारतीय संविधानाने विहित केलेल्या मुदतीतच निवडणूक घेणे शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाने जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये बदल (विभाजन, एकत्रीकरण इत्यादी) करू नये. याबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे दि.२७ जानेवारी, २००५ चे आदेश आहेत.

४. <u>प्रभाग रचना करण्याची कार्यपद्धती:</u>

**४.१ जनगणनेची लोकसंख्या**

जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेली लगतच्या जनगणनेनुसार जिल्हयातील जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रातील एकूण ग्रामीण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रगणक गटाचे नकाशे व घरयादी जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी. प्रभाग रचना ही फक्त **लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या** आधारे केली जाते, म्हणून त्या क्षेत्रातील मतदार संख्या अथवा सध्याची रहिवाशांची संख्या याचा प्रभाग रचनेशी कसलाही संबंध येत नाही.

जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रातील ग्रामीण लोकसंख्या निश्चित करताना जिल्हयातील किंवा तालुक्यातील महानगरपालिका, नगर परिषदा /नगर पंचायती, कटक मंडळे (कन्टोनमेंट बोर्ड) यांची लोकसंख्या वगळून शिल्लक राहणारी लोकसंख्या विचारात घ्यावयाची आहे, याबाबत जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी.

## ४.२ सदस्य संख्या:

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, दि.३१ जानेवारी, २०२२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ९ तसेच महाराष्ट्र असाधारण क्रमांक ६३, दि.२१ फेब्रुवारी, २०२२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६१ मधील प्रकरण-१, नियम २-अ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५५ व जास्तीत जास्त ८५ इतकी अनुज्ञेय असून राज्य निवडणूक आयोगाकडून प्रत्येक जिल्हयाच्या ग्रामीण लोकसंख्येच्याआधारे जिल्हा परिषदेची सदस्य संख्या निश्चित करण्यात येते. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ च्या कलम १२ व ५८ मधील तरतुदीनूसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांकरिता जागा आरक्षित ठेवावयाच्या आहेत.

उपरोक्त उल्लेख केल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१५/१२/२०२१, १९/०१/२०२२, दि.०३/०३/२०२२ व दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आगामी सार्वत्रिक / पोट निवडणुकांमध्ये सद्यस्थितीत नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाहीत.

## ४.३ <u>प्रभागाची संख्या:</u>

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम ९ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक ( मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६१ मधील प्रकरण-१, नियम २-अ मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगाने प्रत्येक जिल्हा परिषदेस ठरवून दिलेल्या सदस्य संख्येइतके निवडणूक विभाग देय ठरतात. प्रत्येक पंचायत समिती स्तरावर जिल्हा परिषदेचे किमान दोन निवडणूक विभाग असणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम ५८ नुसार जिल्हा परिषदेअंतर्गत प्रत्येक पंचायत समितीमधील प्रत्येक निवडणूक विभागाचे दोन निर्वाचक गणात विभाजन करण्यात येते.

**४.४ निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची सरासरी लोकसंख्या :-**

प्रत्येक निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची रचना करताना जिल्हा परिषद/पंचायत समितीची एकूण लोकसंख्या भागिले त्या जिल्हा परिषद/पंचायत समितीस देय असलेली एकूण सदस्य संख्या या सूत्रानुसार निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. निवडणूक विभागाची/ निर्वाचक गणाची लोकसंख्या त्या निवडणूक विभागाच्या/ निर्वाचक गणाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक असेल. असे दोन निर्वाचक गण एकत्र करुन जिल्हा परिषदेचा एक निवडणूक विभाग तयार करावयाचा आहे.

ज्या पंचायत समितीला दोन निवडणूक विभाग व चार निर्वाचक गण देय होत आहेत अशा ठिकाणी लोकसंख्येची सरासरी निवडणूक विभागाच्या सरासरी लोकसंख्येपेक्षा भिन्न असेल.

**४.५ <u>निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना करण्याची मार्गदर्शक तत्वे:</u>**

४.५.१ निवडणूक विभाग व निर्वाचक गणाची रचना सुरुवात उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. त्यानंतर उत्तरेकडून ईशान्यकडे त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करताना सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. निवडणूक विभाग /निर्वाचक गण यांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रत्येक निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी.

४.५.२ निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी. तसेच मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणात गणली जातील याची दक्षता घ्यावी.

४.५.३ निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रगणक गट फोडणे आवश्यक असल्यास आणि घरयाद्या उपलब्ध नसतील, तर त्या प्रकरणात सोबतच्या **परिशिष्ट-८** मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रगणक गटाचे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरीत झाली आहे, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्या लगतच्या सालामध्ये झाली असेल त्यावेळेच्या लोकसंख्येचे विभाजन कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना जनगणनेच्यावेळी संबंधित इमारत अस्तित्वात होती व संबंधित व्यक्ती तेथे राहात होती याची शहानिशा करावी. तसेच प्रगणक गट फोडल्यास भौगोलिक सीमा योग्यप्रकारे दाखविल्या जातील याचीही दक्षता घेण्यात यावी.

४.५.४ निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना करताना शक्यतोवर ग्रामपंचायतीचे विभाजन होता कामा नये. मात्र ग्रामपंचायतीचे विभाजन करणे आवश्यक असेल तर ते शक्यतो ग्रामपंचायतींच्या प्रभागानुसारच करण्यात यावे. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही,याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

४.५.५ निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना आटोपशीर असावी व शक्य तेथवर भौगोलिकदृष्टया सलगता असली पाहिजे.

४.५.६ अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

४.५.७ निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना करताना नागरिकांचे दळणवळण विचारात घ्यावे.

४.५.८ प्रत्येक निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, पश्चिम व दक्षिण अशा दिशा नमूद कराव्यात. निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या सीमारेषेचे वर्णनावरुनच नागरिकांना त्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

४.५.९ निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना करताना त्यांना अनुक्रमांक व नाव देण्यात येतात. परंतु पुर्नरचित निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचे नाव ठरविताना त्यामध्ये समाविष्ट असलेले सर्वात जास्त लोकसंख्या असलेले गावाचे नाव त्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणास देण्यात यावे.

**४.६ <u>निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची लोकसंख्या आणि मर्यादेचे पालन:</u>**

निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना करताना त्या जिल्हा परिषद / पंचायत समितीमधील सरासरी लोकसंख्या, १० टक्के कमाल/ किमान मर्यादेचे पालन करावे. अपवादात्मक परिस्थितीत भौगोलिक परिस्थितीमुळे अगर प्रगणक गट न फोडल्यामुळे प्रभागाची लोकसंख्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी अगर जास्त होत असेल, तर त्यास विभागीय आयुक्त यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

**४.७ <u>गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे:</u>**

४.७.१ जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती निर्वाचक गणाच्या रचनेची मांडणी गुगल अर्थ (MRSAC) च्या नकाशावर करणे अनिवार्य आहे.

४.७.२ जिल्हयाचा एकत्रित आणि प्रत्येक तालुक्याचा असे स्वतंत्र नकाशे तयार करावेत.

४.७.३ प्रथम जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती निर्वाचक गणामध्ये गावांच्या सीमा/ हद्दी काळ्या रंगाच्या ठिपक्यांनी चिन्हांकित

करावी. प्रत्येक ग्रामपंचायतीचे नाव, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

४.७.४ जिल्हा परिषद क्षेत्रात समाविष्ट न करण्यात आलेले क्षेत्र हिरव्या रंगाने दर्शवावे. जिल्हा परिषद निवडणूक विभागाची सीमा/ हद्दी बहुभूज (polygon) नकाशावर काढून त्या लाल रंगाने दर्शवाव्यात. प्रत्येक निवडणूक विभागाच्या बहुभूजास त्या निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

४.७.५ पंचायत समिती निर्वाचक गणाची सीमा/ हद्दी बहुभूज (polygon) नकाशावर काढून निळया रंगाने दर्शवाव्यात. प्रत्येक निर्वाचक गणाच्या बहुभूजास त्या निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

४.७.६ नकाशावर गावातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इ. स्पष्टपणे दर्शवावे.

४.७.७ अशा तयार केलेल्या नकाशाची केएमएल (KML) / केएमझेड (KMZ) फाईल तयार करावी. संपूर्ण हद्दीची तसेच जिल्हयाची व पंचायत समितीनिहाय इमेज फाईल देखील तयार करावी. गुगल अर्थच्या नकाशावर निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना मांडणी करण्याची कार्यपध्दती **परिशिष्ट -१५** मध्ये देण्यात आली आहे. या कार्यपध्दतीचा अवलंब करून केएमएल (kml) / केएमझेड (kmz) फाईल तयार करावी.

## ५. प्रारुप प्रभाग रचना

५.१ निवडणूक विभाग व निर्वाचक गण प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात यावी.

i) जिल्हा परिषद क्षेत्राची संपूर्ण माहिती असलेला उप जिल्हाधिकारी

ii) प्रभाग रचनेशी संबंधित असलेले तहसिलदार

iii) संगणक तज्ञ

iv) आवश्यकतेनुसार इतर अधिकारी

प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्याची जबाबदारी संबंधित समितीवर असेल.

५.२ **प्रारूप तयार करणे:**

तहसिलदार यांनी तयार केलेला कच्चा आराखडा प्रभाग रचना समितीसमोर ठेवण्यात येईल. सदर समिती हा आराखडा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी व या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासेल. त्याचप्रमाणे प्रभाग रचना, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व महिलांचे आरक्षण हे नियमानुसार तयार झाले आहे हे देखील तपासेल. सदर समिती प्रारूप प्रभाग रचनेचे गुगल अर्थ नकाशे परिच्छेद ४.७ नुसार योग्य रितीने तयार केले आहेत किंवा कसे हे तपासून घेईल, अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करेल. प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

५.३ **प्रारूप प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांची मान्यता:**

प्रारूप प्रभाग रचनेची समितीने तपासणी केल्यानंतर प्रभाग रचनेच्या योग्यतेबाबत समितीचे समाधान झाल्यानंतर जिल्हाधिकारी सदर प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मुदतीत **परिशिष्ट-१४** मध्ये विभागीय आयुक्त यांना सादर करतील.

५.४ जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेची आवश्यक ती तपासणी करून ती तरतूदीनुसार करण्यात आली आहे किंवा एखादा निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची लोकसंख्या १० टक्केपेक्षा कमी किंवा

जास्त होत असल्यास जिल्हाधिकारी यांनी दिलेली कारणे संयुक्तिक आहेत किंवा नाहीत, हे तपासून प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात विभागीय आयुक्त यांनी निर्णय घ्यावा.

५.५ जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेच्या (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता आरक्षित प्रभागांसह) प्रस्तावास विभागीय आयुक्त यांनी विहित मुदतीत मान्यता दयावी.

**६. आरक्षित पदांसाठी सदस्य संख्या निश्चित करण्याची कार्यपध्दती :**

**६.१** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२ व ५८ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये एकूण जागांपैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित ठेवण्यात येतात.

**६.२** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ मधील तरतुदी तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्र.५३८६/२००६ (उदय पवार विरुध्द राज्य निवडणूक आयोग व इतर) मध्ये दि.३/१०/२००६ रोजी व त्यानंतर रिट याचिका क्र.६३८९/२००६ (प्रशात बंब विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर) मध्ये दि.०९/०२/२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यास सुरुवात केली असून या आदेशांचे अनुपालन आयोग करीत आहे.

**६.३** आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सन २०२२ मध्ये होणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समितीची पाचवी निवडणूक आहे. त्यामुळे सन २००२, २००७, २०१२ व २०१७ मध्ये असलेले निवडणूक विभाग व निर्वाचक विभागाचे आरक्षण विचारात घेऊन या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे. याकरिता एखाद्या निवडणूक विभागात/निर्वाचक गणात मागील निवडणुकीत कोणते आरक्षण होते हे निश्चित करताना पुढील

कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. याकरिता एखादा निवडणूक विभाग/ निर्वाचक गण नविन आहे किंवा कसे, हे केवळ त्यांच्या नावावरुन ठरविण्यात येणार नाही. एखाद्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील पूर्वीचे आरक्षण ठरविण्यासाठी त्यामध्ये जी गावे समाविष्ट केली आहेत, त्यावरील जास्तीत जास्त समान आरक्षण असलेल्या गावांच्या लगतच्या जनगणनेनुसार असलेल्या एकूण लोकसंख्येची बेरीज घ्यावी. ही लोकसंख्येची बेरीज निवडणूक विभाग/निर्वाचक गणाच्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा अधिक होत असेल तर तो निवडणूक विभाग / निर्वाचक गण मागील निवडणुकीमध्ये त्याकरिता आरक्षित झाला होता असे मानण्यात येईल, व ते आरक्षण त्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणात टाकता येणार नाही.

मात्र जास्तीत जास्त समान आरक्षण असलेल्या गावांची लगतच्या जनगणनेनुसार असलेली एकूण लोकसंख्येची बेरीज निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा कमी होत असेल तर तो निवडणूक विभाग / निर्वाचक गण नवीन आहे असे मानण्यात येईल, व त्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणावर कोणतेही आरक्षण टाकता येईल याकरिता सोबत दिलेल्या **परिशिष्ट-९, १०,११ व १२** मधील विवरणपत्राच्या आधारे सर्व प्रवर्गाचे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) तसेच स्त्रियांचे मागील निवडणुकीमधील आरक्षण निश्चित करावे.

६.४ मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानंतर पार पडलेल्या निवडणुकांमधील आरक्षणाची माहिती **परिशिष्ट-१३(अ) व १३(ब)** मध्ये भरण्यात यावी, जेणेकरुन पुढील निवडणुकीमधील आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे सोपे जाईल.

**७. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता प्राधान्यक्रम :-**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुकीसाठी आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याची कार्यवाही करावयाची आहे. याबाबत मागील निवडणुकांमध्ये झालेल्या आरक्षणाच्या शक्यता विचारात घेऊन **परिशिष्ट-२३** मध्ये नमूद प्राधान्यक्रमानुसार आरक्षण देण्याची कार्यवाही करावी.

एखादया पदाचे आरक्षण निश्चित करताना **परिशिष्ट-२३** मधील यथास्थिती कमीत कमी १ ते जास्तीत जास्त १३ शक्यता उद्भवू शकतात. त्या शक्यतांपैकी उद्भवणाऱ्या शक्यतांचा विचार करुन त्यानुसार प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.

i) प्रथम अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने मागील निवडणुकांमध्ये आरक्षित न झालेल्या प्रभागांचा विचार करण्यात येईल. असे करताना वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने निवडणूक विभाग/ निर्वाचक गणांचा आरक्षणाकरिता विचार करण्यात येईल.

ii) महिलांचे आरक्षण ( अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांसह) निश्चित करताना देखील वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या आरक्षणाकरिता विचार करण्यात येईल.

iii) वरील उदाहरणानुसार प्राधान्यक्रम विचारात घेताना ज्या प्रवर्गाचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यात येत आहे, ते आरक्षण आहे/नाही ते विचारात घेण्यात येईल.

महिलांच्या बाबतीत आरक्षण विचारात घेताना त्याच प्रवर्गातील महिलांचे आरक्षण होते किंवा कसे ते विचारात घेण्यात यावे.

**८. अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीकरिता आरक्षित निवडणूक विभाग / निर्वाचक गण निश्चित करणे:**

**८.१ अनुसूचित जातीच्या (अ.जा.) आरक्षणाचे तत्व:**

अनुसूचित जातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे निवडणूक विभाग / निर्वाचक गणातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने करण्यात येईल. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची निवडणूक विभाग / निर्वाचक गणातील एकूण लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने **परिशिष्ट - ६(अ) व ६(ब)** नुसार तक्ता तयार करावा.

त्यानंतर यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) अनुसूचित जातीकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग/ निर्वाचक गण वगळण्यात यावेत. असे करताना परिच्छेद ५ व ६ मधील सूचना विचारात घ्याव्यात. त्यानंतर अनुसूचित जातीसाठी अनुज्ञेय असलेल्या जागा, उर्वरित निवडणूक विभाग /निर्वाचक गणापैकी सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणापासून सुरुवात करुन नेमून देण्यात याव्यात. असे करताना सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये यापूर्वीच्या (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) निवडणुकीमध्ये आरक्षण देऊन झाले असल्यास पुन्हा उतरत्याक्रमाने असलेल्या पहिल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणापासून सुरुवात करावी.

**८.२ अनुसूचित जमातीच्या (अ.ज.) आरक्षणाचे तत्व:**

अनुसूचित जमातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे निवडणूक विभाग / निर्वाचक गणातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने करण्यात येईल. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची निवडणूक विभाग / निर्वाचक गणातील एकूण लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने **परिशिष्ट - ७(अ) व ७(ब)** नुसार तक्ता तयार करावा.

त्यानंतर यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग/ निर्वाचक गण वगळण्यात यावेत. असे करताना परिच्छेद ५ व ६ मधील सूचना विचारात घ्याव्यात. त्यानंतर अनुसूचित जमातीसाठी अनुज्ञेय असलेल्या जागा, उर्वरित निवडणूक विभाग / निर्वाचक गणापैकी सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणापासून सुरुवात करुन नेमून देण्यात याव्यात. असे करताना सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये यापूर्वीच्या (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) निवडणुकीमध्ये आरक्षण देऊन झाले असल्यास पुन्हा उतरत्याक्रमाने असलेल्या पहिल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणापासून सुरुवात करावी.

९. **एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जागा येत असल्यास :-**

जर एकच निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हीसाठी आरक्षित होत असेल तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीपैकी ज्याची लोकसंख्या अधिक असेल त्याच्याकरिता तो निवडणूक विभाग / निर्वाचक गण आरक्षित होईल मात्र जर त्यांची लोकसंख्या समान असेल तर तो अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीद्वारे निश्चित करावे.

१०. **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाचे (ना.मा.प्र) आरक्षण :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१५/१२/२०२१ व त्यानंतर दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये सद्यस्थितीत नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता तुर्तास कोणत्याही जागा देय होणार नाहीत. तथापि, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार योग्य त्या सूचना स्वतंत्रपणे दिल्या जातील.

**११. महिलांचे आरक्षित प्रभाग निश्चित करणे :**

एकूण जागांच्या ५०% जागा महिलांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक असून महिलांच्या आरक्षणाचे वाटप प्राधान्याने/सोडतीने करण्यात येईल. तसेच महिलांच्या जागांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवताना, निवडणूक विभागात/ निर्वाचक गणात त्याच प्रवर्गातील महिलांचे आरक्षण शक्यतोवर पुन्हा देता येणार नाही.

**११.१ अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे-**

अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित असलेल्या जागा निश्चित करण्यासाठी अनुसूचित जातीकरिता आरक्षित झालेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणांमधून प्राधान्याने/सोडतीने आरक्षित करण्यात याव्यात. मात्र सोडत काढताना मागील निवडणुकांमध्ये (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण त्यावेळी वगळण्यात यावेत.

**११.२ अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे-**

अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित असलेल्या जागा निश्चित करण्यासाठी अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणांमधून प्राधान्याने/सोडतीने आरक्षित करण्यात याव्यात. मात्र सोडत काढताना मागील निवडणुकांमध्ये (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण त्यावेळी वगळण्यात यावेत.

**११.३ सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे-**

सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित असलेल्या जागा निश्चित करण्यासाठी एकूण निवडणूक विभाग / निर्वाचक गणांमधून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळल्यानंतर शिल्लक राहिलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक

गणातून सर्वसाधारण महिला प्राधान्याने/सोडतीने आरक्षित करण्यात याव्यात. मात्र सोडत काढताना मागील निवडणुकांमध्ये (सन २००२, २००७, २०१२ व २०१७) सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण त्यावेळी वगळण्यात यावेत.

**१२. महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण ) आरक्षणाची सोडत काढणे:**

१२.१ विभागीय आयुक्त यांनी प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

१२.२ जिल्हा परिषदांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर ही सोडत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समित्यांच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून सोडत काढण्यात यावी.

१२.३ तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समितीकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

१२.४ सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हा व तालुका स्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यास मोठया प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. (उदा. जिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलक, जिल्हा कार्यालय/ जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ, जिल्हयातील जास्त वाचकवर्ग असेलेल्या वर्तमानपत्र, केबल टि.व्ही. व इतर माध्यमे, इत्यादी) आरक्षणाची सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना **परिशिष्ट-१६** मध्ये देण्यात आला आहे.

१२.५ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणांच्या हद्दी दर्शविणाऱ्या नकाशांमध्ये विभाग व गण यांचे क्रमांक व त्यांच्या चतु:सीमा स्पष्ट कराव्यात. हा नकाशा सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

१२.६ आरक्षण सोडतीसाठी पारदर्शक ड्रम / काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x १५ से.मी. पेक्षा जास्त् नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावेत.

१२.७ सोडतीचे योग्य प्रकारे इतिवृत्त लिहिण्यात यावे. इतिवृत्ताचा नमूना **परिशिष्ट-१७(अ) व १७(ब)** मध्ये देण्यात आला असून त्यासोबतचे विवरणपत्रात सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा नमूद करावा.

**१३. प्रारूप प्रभाग रचनेची व आरक्षणांची व्यापक प्रसिद्धी:**

१३.१ निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे प्रारूप व निश्चित करण्यात आलेले जागांचे आरक्षण याची **परिशिष्ट-१८(अ) व १८(ब)** मधील प्रारूप **अधिसूचना व अनुसूची** तयार करून ती शासन राजपत्रात राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास प्रसिध्द करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल.

१३.२ प्रसिध्द करण्यात आलेल्या निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेच्या नकाशांवर व विहित नमुन्यांवर संबंधीत जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांच्या स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

१३.३ सोडतीचा निकाल वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.

**१४. हरकती व सूचना:**

१४.१ आरक्षण सोडतीअंती उपस्थित नागरिकांना निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना व आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

१४.२ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था जिल्हाधिकारी /संबंधित तहसिलदार यांचे कार्यालयात करण्यात येईल.

१४.३ निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेची प्रारुप अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व स्विकारण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचा तपशील यास **परिशिष्ट-१९** मधील नमून्यात व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा.जसे- संबंधित जिल्हाधिकारी/ तहसिलदार/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलक / संकेतस्थळ, स्थानिक वृत्तपत्रे इत्यादी)

१४.४ हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात येईल, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

१४.५ आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. (**परिशिष्ट-२०**)

१४.६ जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्यांचा गोषवारा **परिशिष्ट-२०** नुसार तयार करुन तो विभागीय आयुक्त यांना सादर करावा.

१४.७ प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल याची उपाययोजना जिल्हाधिकारी/ संबंधित तहसिलदार यांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील याची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

**१५. प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे-**

१५.१ प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या

स्थळी व नेमून दिलेल्या दिनांकास / कालावधीमध्ये विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी दयावी.

१५.२ या सुनावणीकरिता हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडीओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) जिल्हाधिकारी/ संबंधित तहसिलदार यांनी करावी.

१५.३ विभागीय आयुक्त यांनी प्रत्येक हरकती व सूचनांवर सुनावणी देताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. विभागीय आयुक्त यांनी हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीचा गोषवारा **परिशिष्ट-२१** मध्ये नमूद करावा. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतीबाबत, सबंधितांना कायदयातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता/अनावश्यकता यांच्या आधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

**१६. अंतिम प्रभाग रचना:**

१६.१ प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवरील सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी अंतिम निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना व आरक्षण अंतिम करावे.

१६.२ विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी **परिशिष्ट-२२ (अ) व २२ (ब)** नुसार निवडणूक विभाग / निर्वाचक गण आरक्षणासह अंतिम अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. जसे- संबंधित जिल्हाधिकारी/ तहसिलदार/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलक / वेब साईट, स्थानिक वृत्तपत्रे, राज्य निवडणूक आयोगाची वेबसाईट, इत्यादी)

१६.३ निवडणूक विभाग /निर्वाचक गणाची अंतिम प्रभाग रचनेनुसार सॉफ्ट नकाशे (kml/kmz files), नकाशांची इमेजेस, सोबत जोडलेल्या विहित परिशिष्टातील माहिती, सोडतीचे इतिवृत्त, हरकतीचा गोषवारा व त्यावरील विभागीय आयुक्त यांचे सुनावणीअंती आदेश इ.बाबतचा माहिती ईमेलद्वारे अगर उपलब्ध करुन दिलेल्या पध्दतीने राज्य निवडणूक आयोगास सादर करावेत. तसेच अंतिम निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचना (आरक्षणासह) राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

१६.४ निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेकरिता विहित परिशिष्टांवर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असेल. मात्र निवडणूक विभाग व निर्वाचक गणाचे अंतिम प्रसिध्द करण्यात येणाऱे नकाशे व प्रपत्रांवर संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक असेल.

१६.५ यानंतर अंतिम प्रभाग रचनेवर कोणतीही हरकत अगर सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

**१७. गोपनीयता:**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग रचनेचे कामकाज गोपनीयरित्या हाताळण्यात यावे. प्रभाग रचनेची माहिती ही सर्वसामान्य नागरिकांना सोडतीच्या वेळी पहिल्यांदा समजते. तत्पूर्वी राजकीय व्यक्ती, प्रसिध्दी माध्यमे अथवा अन्य व्यक्तींना याबाबतची माहिती देता येणार नाही. तसेच प्रभाग रचनेच्या कामाशी संबंधित अधिकारी अगर कर्मचारी यांच्यावर त्यासाठी कोणालाही दबाव टाकता येणार नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने प्रभाग रचनेची गोपनियता भंग केल्यास त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१८. **सर्वसाधारण**

१८.१ भारताच्या संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना स्वतःहून निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती देता येत नाही.

१८.२ राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना व आरक्षण या विषयावर यापूर्वी काढलेले आदेशात काहीही म्हटले असले तरी, यापूढे होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये केवळ **"जिल्हा परिषदा व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना करणे व आरक्षण) आदेश, २०२२"** या आदेशामध्ये केलेल्या तरतूदी लागू राहतील.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

<u>सहपत्र</u> :- सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते २३

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

## परिशिष्ट अनुक्रमणिका

## जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव पुढील परिशिष्टानुसार तयार करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| i. | परिशिष्ट- १ | - | जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समितीचा जनगणनेनुसार आकडेवारीचा गोषवारा |
| ii. | परिशिष्ट-२(अ) | - | जिल्हा परिषद सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना |
| iii. | परिशिष्ट-२(ब) | - | पंचायत समिती सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना |
| iv. | परिशिष्ट-३(अ) | - | जिल्हा परिषद निवडणूक विभागाची लोकसंख्या, समाविष्ट ग्रामपंचायतीची संख्या व एकूण समाविष्ट गावांची संख्या |
| v. | परिशिष्ट-३(ब) | - | पंचायत समिती निर्वाचक गणाची लोकसंख्या, समाविष्ट ग्रामपंचायतीची संख्या व एकूण समाविष्ट गावांची संख्या |
| vi. | परिशिष्ट-४(अ) | - | जिल्हा परिषद निवडणूक विभागाची जनगणनेनुसार लोकसंख्या दर्शविणारे विवरणपत्र |
| vii. | परिशिष्ट-४(ब) | - | पंचायत समिती निर्वाचक गणाची जनगणनेनुसार लोकसंख्या दर्शविणारे विवरणपत्र |
| viii. | परिशिष्ट-५(अ) | - | जिल्हा परिषद आरक्षित निवडणूक विभाग निश्चितीबाबतचा नमुना |
| ix. | परिशिष्ट-५(ब) | - | पंचायत समिती आरक्षित निर्वाचक गण निश्चितीबाबतचा नमुना |
| x. | परिशिष्ट-६(अ) | - | जिल्हा परिषद निवडणूक विभागातील अनुसूचित जातीचा उतरता क्रम |
| xi. | परिशिष्ट-६(ब) | - | पंचायत समिती निर्वाचक गणातील अनुसूचित जातीचा उतरता क्रम |
| xii. | परिशिष्ट-७(अ) | - | जिल्हा परिषद निवडणूक विभागातील अनुसूचित जमातीचा उतरता क्रम |
| xiii. | परिशिष्ट-७(ब) | - | पंचायत समिती निर्वाचक गणातील अनुसूचित जमातीचा उतरता क्रम |
| xiv. | परिशिष्ट-८ | - | प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र. |
| xv. | परिशिष्ट-९ | - | सन २००२ चे आरक्षण निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र. |
| xvi. | परिशिष्ट-१० | - | सन २००७ चे आरक्षण निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र |
| xvii. | परिशिष्ट-११ | - | सन २०१२ चे आरक्षण निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र |
| xviii. | परिशिष्ट-१२ | - | सन २०१७ चे आरक्षण निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र |
| xix. | परिशिष्ट-१३(अ) | - | जिल्हा परिषद सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र |
| xx. | परिशिष्ट-१३(ब) | - | पंचायत समिती सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र |
| xxi. | परिशिष्ट-१४ | - | समितीने प्रारुप प्रभाग रचनेबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र. |
| xxii. | परिशिष्ट-१५ | - | गुगल अर्थ/MRSAC च्या नकाशांवर प्रभागरचनेची मांडणी करण्याची कार्यपध्दती |
| xxiii. | परिशिष्ट-१६ | - | सोडतीसंबंधी जाहिर सूचना |
| xxiv. | परिशिष्ट-१७ (अ) | - | जिल्हा परिषद आरक्षण सोडतीच्या इतिवृत्ताचा नमूना |
| xxv. | परिशिष्ट-१७ (ब) | - | पंचायत समिती आरक्षण सोडतीच्या इतिवृत्ताचा नमूना |
| xxvi. | परिशिष्ट-१८(अ) | - | जिल्हा परिषद-प्रारुप प्रभाग रचनेकरिता नमुना |
| xxvii. | परिशिष्ट-१८(ब) | - | पंचायत समिती-प्रारुप प्रभाग रचनेकरिता नमुना |
| xxviii. | परिशिष्ट-१९ | - | प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी -जाहिर सूचनेचा नमूना |
| xxix. | परिशिष्ट-२० | - | हरकती व सूचनांचा गोषवारा |
| xxx. | परिशिष्ट-२१ | - | हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीचा गोषवारा |
| xxxi. | परिशिष्ट-२२(अ) | - | जिल्हा परिषद-अंतिम प्रभाग रचनेकरिता नमुना |
| xxxii. | परिशिष्ट- २२(ब) | - | पंचायत समिती-अंतिम प्रभाग रचनेकरिता नमुना |
| xxxiii. | परिशिष्ट-२३ | - | आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता प्राधान्यक्रम तक्ता |

परिशिष्ट-१

----------- जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्या

-----------------जनगणनेनुसार आकडेवारीचा गोषवारा

| अ.क्र. | जिल्हा | तालुका/पंचायत समितीचे नाव | सन २०११ च्या जनगणनेनुसार | | | संपूर्णत: अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे किंवा कसे ? (होय/नाही) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | |
| १. | | | | | | |
| | | | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | तालुका/पंचायत समितीचे नाव | सन २०११ च्या जनगणनेनुसार | | | संपूर्णत: अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे किंवा कसे ? (होय/नाही) |
| | | | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | एकूण | | | | | |

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त विवरणपत्रात नमूद केलेली -------- जिल्हयाची जनगणना २०११ नुसार ग्रामीण क्षेत्राची तालुकानिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची आकडेवारी तपासून बरोबर असल्याची खात्री केली आहे. उपरोक्त लोकसंख्येची परिगणना करताना जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील कोणताही भाग (ग्रामपंचायत / वाडया / वस्त्या / तांडे इ.) वगळण्यात आलेला नाही. तसेच त्यामध्ये महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, छावणी क्षेत्र, कटक क्षेत्र इत्यादी नागरी भागातील लोकसंख्येचा समावेश करण्यात आलेला नाही. सन ------- च्या जनगणनेनंतर ग्रामीण क्षेत्रामध्ये झालेले बदल सदर माहिती पाठविताना विचारात घेण्यात आले आहेत.

दिनांक जिल्हाधिकारी

परिशिष्ट-२(अ)

जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक------

------- जिल्हा परिषद ----------- सदस्य संख्या व आरक्षणाबाबत विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| (१) | जिल्हा परिषदेची एकूण लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (२) | अनुसूचित जातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (३) | अनुसूचित जमातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (४) | जिल्हा परिषदेस एकूण देय सदस्य संख्या | |
| (५) | जिल्हा परिषदेतील एकूण निवडणूक विभागांची संख्या | |
| (६) | अनुसूचित जातीसाठी आरक्षित सदस्य संख्या<br>(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)<br>(सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जातीची लोकसंख्या}}{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}} \times$ एकूण जागा )<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (७) | अनुसूचित जमातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (८) | अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सदस्य संख्या<br>(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)<br>(सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जमातीची लोकसंख्या}}{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}} \times$ एकूण जागा )<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (९) | स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन<br>सूत्र= $\frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{२}$<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (९-अ) | स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागाची विभागणी<br>१. अनुसूचित जातीसाठी<br>सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$<br>२. अनुसूचित जमातीसाठी<br>सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$<br>३. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणाऱ्या उर्वरित जागा | |

| | | |
|---|---|---|
| | (सूत्र= अ.क्र.(९) - [अ.क्र.(९-अ) १. +(९-अ) २.]<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (१०) | अनारक्षित सदस्य संख्या<br>(सूत्र= अ.क्र.४ - [अ.क्र.(६) +(८)-(९-अ) ३.] | |

सही/-
जिल्हाधिकारी

परिशिष्ट-२(ब)

पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक------

------- जिल्ह्यातील ----------- पंचायत समितीची सदस्य संख्या व आरक्षणाबाबत

विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| (१) | पंचायत समितीची एकूण लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (२) | अनुसूचित जातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (३) | अनुसूचित जमातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (४) | पंचायत समितीस एकूण देय सदस्य संख्या | |
| (५) | पंचायत समितीमधील एकूण निर्वाचक गणांची संख्या | |
| (६) | अनुसूचित जातीसाठी आरक्षित सदस्य संख्या<br>(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)<br>(सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जातीची लोकसंख्या}}{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}} \times$ एकूण जागा )<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (७) | अनुसूचित जमातीची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | |
| (८) | अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सदस्य संख्या<br>(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)<br>(सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जमातीची लोकसंख्या}}{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}} \times$ एकूण जागा )<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (९) | स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन<br>सूत्र= $\frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{२}$<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (९-अ) | स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागाची विभागणी<br>१. अनुसूचित जातीसाठी<br>सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$ | |

| | | |
|---|---|---|
| | २. अनुसूचित जमातीसाठी<br>सूत्र= $\frac{\text{अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{२}$<br>३. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणाऱ्या उर्वरित जागा<br>(सूत्र= अ.क्र.(९) - [अ.क्र.(९-अ) १. +(९-अ) २.]<br>(निम्म्यापेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात यावा तर जास्त असल्यास पुढील संख्येने पूर्णांकित करण्यात यावा.) | |
| (१०) | अनारक्षित सदस्य संख्या<br>(सूत्र= अ.क्र.४ - [अ.क्र.(६) +(८)-(९-अ) ३.] | |

सही/-
जिल्हाधिकारी

परिशिष्ट-३(अ)

प्रारूप जिल्हा परिषद निवडणूक विभाग

-------- जिल्हा परिषदेच्या प्रारूप निवडणूक विभागातील लोकसंख्या,

ग्रामपंचायतींची संख्या व गांवांची संख्या इत्यादी दर्शविणारा गोषवारा

| अ.क्र. | तालुका | जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्रमांक | जिल्हा परिषद निवडणूक विभाग | | | २०११ च्या जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवडणूक विभागाचे नाव | एकूण ग्रामपंचायतींची संख्या | एकूण समाविष्ट गांवे | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| | इत्यादी | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

परिशिष्ट-३(ब)

प्रारूप पंचायत समिती निर्वाचक गण

-------- पंचायत समितीच्या प्रारूप निर्वाचक गणातील लोकसंख्या,

ग्रामपंचायतींची संख्या व गांवांची संख्या इत्यादी दर्शविणारा गोषवारा

| अ.क्र. | तालुका | पंचायत समिती निर्वाचक गण क्रमांक | पंचायत समिती निर्वाचक गण | | | २०११ च्या जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निर्वाचक गणाचे नाव | एकूण ग्रामपंचायतींची संख्या | एकूण समाविष्ट गांवे | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| | इत्यादी | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

परिशिष्ट -४(अ)

प्रारुप जिल्हा परिषद निवडणूक विभाग रचना

------- जिल्हा परिषद निवडणूक विभागाची २०११ जनगणनेनुसार

लोकसंख्या दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र | तालुका | विभाग जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्रमांक | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचे नाव | समाविष्ट असणाऱ्या ग्रामपंचाय तीचे नांव | एकूण समाविष्ट असणारी गावे/वस्त्या / तांडे इत्यादी | २०११ च्या जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

परिशिष्ट -४(ब)

प्रारुप पंचायत समिती निर्वाचक गण रचना

------- पंचायत समिती निर्वाचक गणाची २०११ जनगणनेनुसार

लोकसंख्या दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र | तालुका | पंचायत समिती निर्वाचक गण क्रमांक | पंचायत समिती निर्वाचक गणाचे नाव | समाविष्ट असणाऱ्या ग्रामपंचाय तीचे नांव | एकूण समाविष्ट असणारी गावे/वस्त्या/ तांडे इत्यादी | * २०११ च्या जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

परिशिष्ट-५(अ)

( जिल्हा परिषदेकरिता )

जिल्हा परिषद निवडणूक विभागाचा प्रस्ताव तयार करण्याकरिता आणि आरक्षित निवडणूक विभाग निश्चितीकरिता विहित नमुना

जिल्हा परिषदेचे नाव:-

| अ.क्र. | तालुका | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | अ.जा.अ.ज( स्त्री), अ.जा.अ.ज( स्त्री),सर्वसाधारण स्त्रिया यांच्यापैकी ज्या प्रवर्गाकरिता राखीव होईल त्या आरक्षणाचा प्रवर्ग नमूद करावा |
|---|---|---|---|
| | | | |

परिशिष्ट-६(अ)

(जिल्हा परिषदेकरिता )

अनुसूचित जातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभागांपासून उतरत्या क्रमाने सर्व निवडणूक विभागांची माहिती

जिल्हा परिषदेचे नाव :-( आरक्षण कुठल्या प्रवर्गाचे आहे ते नमूद करावे.)

| अ.क्र. | तालुका | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | अनुसूचित जातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभागांपासून सुरूवात करुन उतरत्या क्रमाने | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती (स्त्री) करिता आरक्षित झाल्यास आरक्षण नमूद करावे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

परिशिष्ट -७(अ)

(जिल्हा परिषदेकरिता)

अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभागांपासून उतरत्या क्रमाने सर्व निवडणूक विभागाची माहिती

जिल्हा परिषदेचे नाव:- (आरक्षण कुठल्या प्रवर्गाचे आहे ते नमूद करावे.)

| अ.क्र. | तालुका | जिल्हा परिषद निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निवडणूक विभागापासून सुरूवात करुन उतरत्या क्रमाने | अनुसुचित जमाती व अनुसूचित जमाती (स्त्री) करिता आरक्षित झाल्यास आरक्षण नमूद करावे. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

परिशिष्ट -५ (ब)

(पंचायत समित्याकरिता)

पंचायत समिती निर्वाचक गणाचा प्रस्ताव तयार करण्याकरिता आणि

आरक्षित निर्वाचक गण निश्चितीकरिता विहित नमुने

पंचायत समितीचे नाव:- जिल्हा-

| अ.क्र. | पंचायत समिती निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | अ.जा.अ.ज (स्त्री), अ.जा.अ.ज ( स्त्री), सर्वसाधारण स्त्री यांच्यापैकी ज्या प्रवर्गाकरिता राखीव होईल त्या आरक्षणाचा प्रवर्ग नमूद करावा |
|---|---|---|
| | | |

परिशिष्ट-६ (ब)

( पंचायत समिती करिता प्रत्येक समितीनिहाय स्वतंत्र )

अनुसूचित जातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निर्वाचक गणांपासून उतरत्या क्रमाने पंचायत समितीमधील सर्व निर्वाचक गणांची माहिती

पंचायत समितीचे नाव :- (आरक्षण कुठल्या प्रवर्गाचे आहे ते नमूद करावे.)

| अ.क्र. | पंचायत समिती निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | अनुसूचित जतीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निर्वाचक गणापासून सुरूवात करुन उतरत्या क्रमाने | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती( स्त्री) करिता आरक्षित झाल्यास आरक्षण नमूद करावे |
|---|---|---|---|
| | | | |

परिशिष्ट-७ (ब)

( पंचायत समितीकरिता प्रत्येक समितीनिहाय स्वतंत्र )

अनुसूचित जामातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या निर्वाचक गणांपासून उतरत्या क्रमाने सर्व निर्वाचक गणांची माहिती

पंचायत समितीचे नांव:- (आरक्षण कुठल्या प्रवर्गाचे आहे ते नमूद करावे.)

